**राजेंद्र माने** अभियांत्रिकी **महाविद्यालयाच्या इतिहास मंचचा विशेष उपक्रम**

आंबव येथील प्रबोधन शिक्षण प्रसारक संस्थेच्या राजेंद्र माने अभियांत्रिकी महाविद्यालयात मागील काही वर्षे कार्यरत असणा-या 'इतिहास मंच' या विद्यार्थी संचालित संघटनेने मदनलालजी धिंग्रा यांची पुण्यतिथी(18 ऑगस्ट) आणि मॅडम भिकाजी कामा यांची जयंती(24 सप्टें) चे निमित्त साधून एक विशेष उपक्रम घेतला.

यानिमित्ताने विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाबाहेरील मुलांसाठी एक पाऊल टाकलं आणि ते यशस्वीरीत्या पार देखील पाडलं. साडवली येथील मीनाताई ठाकरे विद्यालयात यादिवशी विद्यार्थ्यांनी एका विशेष कार्यक्रमाचे नियोजन केले होते.

कार्यक्रमाचे स्वरूप तीन प्रमुख सत्रांमध्ये विभागले होते. पहिल्या सत्रात भारतीय इतिहाससंबंधी प्रश्न-उत्तरे तर दुसऱ्या सत्रात इतिहासातील महान व्यक्तींची व क्रांतिकारकांची छायाचित्रे ओळखण्याची स्पर्धा घेण्यात आली ज्यात मुलांनी हिरीरीने भाग घेतला.

यानंतर इतिहास मंचचा विद्यार्थी प्रमुख सुरज कदम याने सादरीकरण केलेल्या परीसंवादात 'मॅडम भिकाजी रुस्तम कामा' आणि 'क्रांतिसूर्य मदनलालजी धिंग्रा' यांचा जीवनप्रवास, त्यांचं स्वातंत्र्यसंग्रामातील कार्य यावर प्रकाश टाकत या व्यक्तींच्या जीवनप्रवासातून आपण काय शिकलं पाहिजे तसेच त्यांना कोणता भारत अपेक्षित होता, आणि आपण भविष्यात कसं वागलं पाहिजे जेणेकरून आपल्यासोबत आपला समाज आणि देश पुढे जाण्यास मदत होईल यावर भर देत मुलांना मार्गदर्शन केले . या संपूर्ण कार्यक्रमातून मुलांमध्ये इतिहासाबद्दल गोडी निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला. संपूर्ण कार्यक्रम उत्तरोत्तर बहरत जात होता तसा मुलांच्या उत्साहात व ज्ञानात भर टाकत होता.

या संपूर्ण कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाचे काम इतिहास मंच विद्यार्थी सदस्य शुभम बुरटे याने अगदी कौशल्याने पार पाडले.

विद्यालयाचे प्राचार्य बळवंत नलावडे यांनी या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी विद्यार्थ्यांना मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाची सांगता विद्यालयाचे प्राचार्य व इतर सर्व शिक्षकांच्या उपस्थितीत झाली. याप्रसंगी त्यांनी विद्यालयातर्फे राजेंद्र माने अभियांत्रिकीच्या इतिहास मंचच्या उपक्रमाबद्दल सदस्यांचं कौतुक केलं आणि पुढील कार्यासाठी शुभेच्छा देत असेच वेगवेगळे समाजप्रबोधन करणारे कार्यक्रम करत राहण्याची अपेक्षा व्यक्त केली.

राजेंद्र माने अभियांत्रिकी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. महेश भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वयक प्रा. विशाल पारकर, विवेक विभूते,अक्षय पेंढारी,दिप्ती गुरव,प्रथमेश सुर्वे,रावजी सावंत,सुयोग खेडेकर,मृणाली कदम,पोर्णिमा,पुष्कर बुर्शे, यांनी नियोजन करत एक विशेष उपक्रम यशस्वीरीत्या पार पाडला.